
**Historicity Research Journal** **Impact Factor : 1.4152 (UIF)**
**ISSN : 2393-8900** **Volume - 3 | Issue - 7 | March – 2017**

# महर्षी विठ्ठलरामजी शिंदे यांचे अस्पृश्य निवारण एक कार्य

**देवकाते बी. एन.**
पी.एच. डी. संशोधक,
इतिहास विभाग, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.




## *प्रस्तावना :*

महाराष्ट्रात एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात प्रबोधनास सुरुवात झाली. त्यासाठी अनेक घटना कारणीभूत ठरल्या होत्या. याचकाळात महाराष्ट्रात व भारतात अनेक धर्म सुधारणा चळवळी, समाज सुधारकांनी केलेले कार्य, वृत्तपत्रांनी केलेली कामगिरी, पाश्चात्य शिक्षणाचा प्रभाव, मराठी भाषेत तयार झालेले साहित्य, इंग्रजी भाषेचा परिणाम अशा अनेक कारणांमुळे राष्ट्रवादाची भावना निर्माण झाली. ब्रिटीशांची परकीय सत्ता दूर करुन सर्वांगीण प्रगतीसाठी राजकीय स्वातंत्र्याची आवश्यकता वाटणारा गट निर्माण झाला होता. काही लोक क्रांतीकारी चळवळीकडे वळले तर काहींनी सनदशीर मार्गाने ब्रिटिशांकडून स्वराज्य मिळविण्यासाठी संघटनात्मक मार्ग व कृती यांचा अवलंब केला. याचवेळी काही समाज सुधारकांना राजकीय स्वातंत्र्यापेक्षा सामाजिक सुधारणेचे अधिक महत्व वाटत होते तेव्हा त्यांनी बहुजन समाजातील अज्ञान, सामाजिक व धार्मिक जीवनातील अनिष्ठ प्रथा इत्यादी दूर करण्यासाठी सामाजिक सुधारणेची चळवळ सुरु केली होती.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अज्ञाना विरुध्द वैचारिक बंड करुन जुन्या धार्मिकअनिष्ठ परंपरा नष्ट करण्याचा प्रयत्न करुन स्वातंत्र्य समता व बंधुत्व या तत्वांचा अवलंब करुन समाज जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. प्रार्थना समाज, आर्य समाज, यातूनच त्यांचे व्यक्तिमत्व घडत गेले. बारामतीचे समाज सुधारक रामचंद्र आण्णाजी कळसकर हे महार, मांग जातीतील लोकांसाठी खेडयातील परिसरात उद्योग शाळा स्थापन करुन शिक्षण प्रसाराचे कार्य मोठया तळमळतेने चालवित होते. त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन महर्षी शिंदे यांनी घेऊन अस्पृश्य मागासलेल्या लोकांसाठी काहीतरी करण्याचे स्वप्न उराशी बाळगले होते. महात्मा फुले यांच्या पावलावर पाऊल ठेवून प्रार्थना समाजाकडे झुकले. त्यांच्या रोजनीशीत याची नोंद आढळते (१८९८)

प्रार्थना समाजाच्या माध्यमातून सामाजिक कार्य करण्यासाठी त्यांनी सुरुवात केली. विलायत मधून भारतात परतल्यावर महर्षी शिंदे यांनी प्रार्थना समाजाचे मिशनरी म्हणून प्रार्थना समाजाच्या कार्यास प्रारंभ केला. या समाजाने उदार धर्माची व एकेश्वरवादाचा पुरस्कार केला होता. हा प्रार्थना समाज परमहंस सभेच्या वैचारिक अधिष्ठाणातून तयार झाला होता. परंतु रानडे, भांडारकर यांच्या नेतृत्वाखाली या समाजाचे कार्य चालू होते. धार्मिक वाचन, पोस्टल मिशन, सुलभ संगीत पुस्तीका इ. उपकृत या समाजाने सुरु करुन समाज प्रबोधनाचे ज्ञानाधिष्ठीत शिक्षण देण्याचा प्रयत्न केला.

महात्मा फले यांनी अस्पृश्यता निवारणाची पहिली बैठक पुण्यात घेऊन कार्याला सुरुवात केली तसेच जातिभेद, अंधश्रध्दा, रुढीपरंपरा या अनिष्ठ प्रथेमुळे समाजात मोठी सामाजिक विषमता निर्माण झाली होती ती दूर करण्याचे काम महर्षी वि.रा. शिंदे यांनी केले. सामाजिक विषमता नष्ठ झाल्याशिवाय समाजाची प्रगती होणार नाही. शिक्षण हे रामबाण औषध आहे हे ओळखून महर्षी शिंदे यांनी **"डिप्रेस क्लास मिशन सोसायटी ऑफ इंडिया"** या संस्थेची स्थापना केली.

भारतीय अस्पृश्यतेचे मूळ शोधत असताना अस्पृश्यता हे आर्यपूर्व असावी असे त्यांनी मत व्यक्त केले. अस्पृश्य हे एकेकाळचे वैभव भोगलेले राजे होते परंतु केवळ जेत्यांनी त्यांचा पराभव केल्यामुळे त्यांच्या कपाळीही अस्पृश्यता आलेली असावी. आजचे अस्पृश्य हे एकेकाळचे मोठे राजवैभव भोगलेले होते[२]

महर्षी वि.रा. शिंदे यांनी **"अस्पृश्यांचे राजकारण"** या लेखातून त्यांनी समाज जागृती करण्याचा खटाटोप चालविला होता. ब्रम्हदेशात तुहा राजा फ तुह इत्यादी अस्पृश्य वर्ग या वर्गाला ज्ञानाचे भांडार खुले करुन दिले पाहिजे. महर्षी वि.रा. शिंदे यांनी अस्पृश्यांचे राजकारण या लेखात सांगतात महर्षी शिंदे यांनी मांडलेले विचार पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ‘who were the shudras & How they came to be the furth in the india Aryan Society’ या ग्रंथात मांडलेला आहे.

अस्पृश्य लोक धर्माने बौध्द आहेत हे सांगताना त्यांनी अस्पृश्य समाजातील लोक गीतांचा आधार घेऊन भारतीय संस्कृती म्हणजे आर्य संस्कृती हे चुकीचे सांगितले. भारतीय लोकांचे कुलदैवते आर्यपूर्व संस्कृतीतील आहेत या निष्कर्षाच्या माध्यमातून अस्पृश्यतेचे मूळ जगासमोर मांडण्याचा प्रयत्न केला.

अस्पृश्यांच्या उच्चाटनासाठी स्वतः महर्षी शिंदे त्यांच्याबरोबर राहून जगण्याची घरगुती चालीरितीची, खाण्या पिण्याची, चांगल्या वाईट सवयीची अनुभूती घेवून आपल्या संशोधनात्मक सर्वेक्षण करुन प्रत्यक्षवादी सूक्ष्म अध्ययनाची जोड देवून अस्पृश्यता निवारण हे धर्म कार्य आहे हे ओळखून ते या समाज कार्याकडे आकर्षित झाले[३]

भारतात अस्पृश्यता किती भयानक पाळली जाते याचे विदारक चित्र महर्षी शिंदे यांना पहावयास मिळाले. ते म्हणतात की मलबार प्रांतातील अस्पृश्य लोकांना पशू सारखे जीवन जगावे लागत होते. चेरुमा या जातीचे अस्पृश्य लोक मालकाच्या शेतात वस्ती करुन पशू प्रमाणे राबत असत, शेताच्या विक्री बरोबर त्यांची मालकी नवीन शेतमालकाकडे जात असे ही कुळे जनावरा प्रमाणे इतरांना भाडयाने दिली जात असे. एवढेच नव्हे तर अशा गुलामांची खरेदी विक्री होत असे. कर्नल ऑलकॉट यांनी **"पुअर पारिया"** या पुस्तकात सन १९०० सालातील एक कर्ज रोख्याचा उताराच दिलेला आहे. त्रिचनापल्ली येथे एक भयंकर दृश्य दिसले. म्युनिसिपालटीच्या केराच्या अवजड गाडीला एका बाजूला एक रेडा जुंपलेला होता तर दुसऱ्या बाजूला एका तरुण मजुरानेच आपली मान लावली होती. महर्षी शिंदे यांनी चौकशी केली तेव्हा तो रोमन कॅथॉलिक असलेला तरुण पूर्वाश्रमीचा पारिया होता असे समजले.

अशाप्रकारे अखंड हिंदुस्थान फिरुन पाहिल्यानंतर अस्पृश्य लोकांचे विदारक चित्रण दिसले. यावर उपाय शोधण्याचा प्रयत्न केला २८ ऑक्टो १९०५ रोजी भिंगार गावी श्रीपतराव थोरात, पांडूरंग लक्ष्मण डांगळे. इ वर्गातील लोकांवर प्रभाव पडला. मुंबई येथे एलफिस्टन रोडवर शेठ दामोदरदास सुरवडवाला यांच्या उदार देणगीतून **डिप्रेस्ड क्लास मिशन संस्थेची** स्थापना झाली. न्या. चंदावरकर यांनी अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, हया नीच मानल्या गेलेल्या लोकांना वर आणण्याचा प्रयत्न करण्यात आम्ही स्वतःलाच वर आणीत आहोत हे पवित्र कार्य करीत असता आम्ही लोकांचा उध्दार करणार हा घमेंडीचा विचार आमच्या अंतःकरणात न शिरो कार्यकारी मंडळ बनवून महर्षी शिंदे यांनी स्वतःकडे सेक्रेटरी पद घेऊन आजन्म या संस्थेची सेवा करीत राहिले.

१९०६ मध्ये मिशनची पहिली शाळा मुंबईतील एल्फिस्टन रोडवर सुरु झाली मिशनचा एक कटाक्ष होता की अस्पृश्य लोक ज्या ठिकाणी रहातात त्या ठिकाणी या लोकांनी मिळून मिसळून रहावे. त्याकाळात दाखविलेले धाडस, त्यांच्या कार्यात सहभागी झालेली त्यांच्या कुटुंबातील माणसे त्या सर्वांनी अत्यंत थोर अंतःकरणानी अस्पृश्यांची केलेली सेवा सुश्रुषा फार मोलाची होती[४]

या मिशनच्या माध्यमातून उपक्रमाचे आयोजन केले जात त्यात व्याख्याने, कीर्तने, उपासना, लहान मुलांसाठी सहलीचे आयोजन, त्यांना मिठाईचे वाटप, गरजू लोकांना कपडयाचे वाटप, गरीब विशेष विधवा स्त्रियांसाठी शिवण कामाचे वर्ग, लोकांना स्वच्छतेचे धडे, शिक्षण देणे, मुलांना आंघोळ घालणे इत्यादी उपक्रम राबविले जात होते. मुंबई शहरात परळ, देवनार, मदनापूर, कामाठीपूरा या ठिकाणी मराठी व इंग्रजी चौथे इयत्ते पर्यंतच्या शाळा सुरु करण्यात आल्या तर कामाठीपूरातील शाळा भंगी समाजासाठी होती तर परळ व मदनापूर येथील शाळा नीतिशिक्षणासाठी होत्या. तसेच परळ व मदनापूर येथे भजनी मंडळी देखील चालविली जात होते. चामडयाचे बूट तयार करण्याचा कारखाना उघडून त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन दिली.

अस्पृश्य लोकांच्या वस्तीत जाऊन आजारी लोकांची सेवा सुश्रुषा केली जात असत, मद्यपान इतर दुष्ट सामाजिक रुढीचा परामर्श घेणारे एक मासिकही चालविले जात असे. यातून या समाजाचे प्रबोधन होऊ लागले. मुंबई बाहेर पुणे, मनमाड, इगतपूरी, इंदूर, अकोला, अमरावती, दापोली, मंगरुळ, मद्रास, महाबळेश्वर इत्यादी ठिकाणी प्राथमिक शाळा, वस्तीगृहे या सारखे प्रचंड काम डिप्रेस्ड क्लास मिशनने अल्प काळात उभे केले[५] कारण मिशनचा प्रमुख हेतू हा होता की, अस्पृश्य लोकांत त्यांच्या स्वतःच्या प्रयत्नाने सामाजिक व धार्मिक सुधारणा घडवून आणाव्यात. भगिनी जनाक्का शिंदे यांनी आपल्या पनवेल येथील मुख्याध्यापिका पदाचा राजीनामा देवून महर्षी शिंदे यांच्या कार्यात सहभागी झाल्या. तर आई वडील जमखिंडी वरुन आपल्या मुलाने सुरु केलेल्या कार्यात सहभागासाठी मुंबईला आले. संस्थेच्या कामासाठी आर्थिक मदत म्हणून सर्वसामान्य माणसाकडून निधी जमा करण्यासाठी रुपी फंड, कापड फंड, तांदूळ फंड, इत्यादी अभिनव व लोकांच्या संवेदना प्रत्यक्ष कृतीत उतरणारे उपक्रम सुरु केले.

अशाप्रकारे डिप्रेस्ड क्लास मिशनची स्थापना केल्यावर तिने मा ख्रिस्ती मिशनऱ्या प्रमाणे अस्पृश्यांच्या जीवनामध्ये क्रांतिकारी परिवर्तन घडवून आणून त्यांचा विकास साधला. अस्पृश्याची गरीबी हटावि म्हणून शिक्षणाचा प्रसार, नोकरी मिळवून देणे, सा. समस्या सोडविणे, व्यक्तिगत धर्म सार्वजनिक धर्म, धर्म व नागरिकता इ. गुणांचा प्रसार डिप्रेस्ड क्लास मिशनच्या माध्यमातून झाला. अस्पृश्य समाजाचा विकास व्हावा यासाठी पुण्या मध्ये १९१७ साली अस्पृश्यता निवारण संघाची स्थापना करण्यात आली. या मिशनचा हेतू या अस्पृश्य कार्यकर्त्यांचे संमेलन घडवून आणावे, बहुजन समाज व अस्पृश्य बांधवांनी सहकार्याने प्रयत्न करावेत, विविध प्रांतात संघाच्यावतीने परिषदेचे आयोजन करण्यात आले[६]. परिषदेत भाषण करताना महर्षी वि.रा. शिंदे म्हणाले की, **परमेश्वराचा दरवाजा कोणासाठी ही लावलेला नाही.**

१९१९ साली राखीव मतदार संघाबाबत साक्ष देताना मतदाराचे वार्षिक उत्पन्न ३०० व व्हर्नाक्युलर फायनल पर्यंतचे पुरुषांचे शिक्षण असावे अशा अटी होत्या. परंतु अस्पृश्य वर्गाची अवस्था बिकट होती. त्यांच्यासाठी या अटी शिथिल कराव्यात असे प्रतिपादन केले. अस्पृश्यांसाठी वार्षिक उत्पन्न १४४ व इ. मराठी चौथी पर्यंतचे शिक्षण अशा अटी घालण्यात आल्या. उत्तर व मध्य भारताच्या तुलनेत दक्षिण भारताचा भाग आचार विचारांच्या बाबतीत अत्यंत वेगळा होता. पूर्वीच्या मलबार प्रांतात तर अस्पृश्य गणल्या गेलेल्या लोकांवरच जाचक अटी

लादल्या होत्या. त्रावणकोर संस्थानच्या व्हायकोम गावातील देवळात व ये जा करणाऱ्या रस्त्यावर अस्पृश्य लोकांना कायदेशीर मनाई होती. मात्र देवळाच्या रस्त्यावरील असणाऱ्या ख्रिस्ती व मुसलमान लोकांना परवानगी होती.

सन १९२६-३२ या कालखंडात शेतकऱ्यांच्या सभा भरवून भाषणे करुन त्यांच्यामध्ये जागृती निर्माण केली[६]. अस्पृश्यांची शेतकी परिषद, मुंबई इलाखा शेतकरी परिषद, पुणे, वाळवा तालुका शेतकरी परिषद, बोरगाव, तेरदाळ व चांदवड तालुका शेतकरी परिषद इत्यादी परिषदा घेवून तेथील लोकांच्या अडचणी जाणून घेतल्या. मुंबई इलाखा शेतकरी परिषदेचे अध्यक्षपद महर्षी वि. रा. शिंदे यांनी भुषविले होते.

महर्षी वि. रा. शिंदे यांनी स्थापन केलेल्या डिप्रेस्ड क्लासच्यावतीने शिक्षण सुरु केले हे शिक्षण अस्पृश्य, बहुजन यांच्या सर्वांगीण विकासाचे एक प्रभावी साधन म्हणून उपयोगात आणले. यासाठी त्यांनी अनेक उपक्रमांची उभारणी केली त्यात स्त्रियांचे शिक्षण, उद्योगशाळा, नीतिशाळा, महिला मंडळे, विविध परिषदा, वसतिगृहे अशा अनेकांची सुरुवात त्यांनी केली होती. म. फुले, राजर्षी शाहू महाराज, व महर्षी शिंदे यांनी केवळ बहुजन समाजाच्या शिक्षणाला प्रारंभ केला. त्याच बरोबर मुलींना सक्तीचे शिक्षण मिळाले पाहिजे म्हणून शिक्षण हे सार्वत्रिक व्हावे यासाठी शिंदे यांनी शासन दरबारी जावून शिक्षणाला गती, हंटर कमिशनच्या नियुक्तीनंतर अधिक चालना मिळत गेली[७]. पुणे नगर पालिकेत १९१९ साली सक्तीच्या शिक्षणाची मोठी चळवळ झाली. प्राथमिक शिक्षणावर चर्चा व्हावी, मुलीचा सक्तीच्या शिक्षणात समावेश व्हावा यासाठी महर्षी शिंदे यांनी या चर्चेत सहभाग घेवून आपले कार्य तडीस नेले.

सारांश :- महाराष्ट्रात १९ व्या शतकात सामाजिक प्रबोधनास सुरुवात झाली. सामाजिक रुढी परंपरा, अंधश्रध्दा, जातपात यांनी थैमान घातले होते. अशा परिस्थितीत धर्म सुधारणा समाज सुधारणा चळवळीची लाट भारतात सुरु झाली. वृत्तपत्र, पाश्चात्य शिक्षण, साहित्य याचा प्रभाव भारतीय लोकांवर पडून राष्ट्रवादाची भावना प्रबळ झाली. ब्रिटीश सत्ता उलथवून टाकल्या शिवाय भारतीय समाजाची प्रगती होणार नाही यासाठी समाज सुधारक पुढे आले. विष्णुशास्त्री चिपळूणकर, महात्मा फुले, शाहू महाराज, इ. सामाजिक सुधारणा चळवळीवर भर दिला. महर्षी शिंदे यांनी समाजसुधारक रामचंद्र कळसकर यांच्याकडून प्रेरणा घेवून अस्पृश्य महार, मांग जातीतील लोकांना शिक्षण मिळावे यासाठी **डिप्रेस्ड क्लास मिशन सोसायटीची** स्थापना केली.

भारतीय अस्पृश्यतेचे मूळ शोधत असताना अस्पृश्यता ही आर्यपूर्व आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. अस्पृश्य एकेकाळचे वैभव भोगलेले राजे होते परंतु जेत्यांनी त्यांचा पराभव केल्यामुळे त्यांच्या कपाळी ही अस्पृश्यता आलेली असावी. "अस्पृश्यांचे राजकारण" या लेखात अस्पृश्य गणल्या गेलेल्या समाजामध्ये समाज जागृती करण्याचे काम महर्षी शिंदे यांनी केले. अस्पृश्य लोक धर्माने बौध्द आहेत हे सांगताना अस्पृश्य समाजातील लोकगीतांचा आधार घेतला. भारतीय संस्कृती ही आर्य संस्कृती आहे म्हणणे चुकीचे ठरेल. भारतीय लोकांची कुलदैवते आर्यपूर्व संस्कृतीतील आहे याबाबतचा दाखला देवून अस्पृश्यतेचे मूळ जगासमोर मांडण्याचा प्रयत्न केला. अस्पृश्यांच्या उच्चाटनासाठी स्वतःबरोबर राहून चालीरीती, खाण्या पिण्याच्या, चागल्या वाईटाचे अनुभव घेवून अस्पृश्यता निवारणाचे प्रत्यक्ष कार्य धर्म कार्य आहे. ओळखून ते समाज कार्याकडे वळाले. स्त्रियांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत मिळावे यासाठी शासन दरबारी पोटतिडकीने प्रश्न लावून धरला. शेतकी परिषदा मधून शेतकऱ्यांचे प्रबोधन केले. दलित, वंचित समाजाने त्यांना उपेक्षित ठेवले तर मराठा समाजाने त्यांना डावलले. आयुष्यभर मिशनचे करत राहिले.

### तळटीपा :-

१) पवार बा.ग, एक उपेक्षित महामानव म.वि.रा. शिंदे मातृभूमी प्रकाशन, पुणे२०१० पृष्ठ-२३

२) ठोंबरे तानाजी, महर्षी वि.रा. शिंदे यांच्या राजकीय व सामाजिक चळवळी, लोकवाड्मयगृह मुंबई २००९ पृष्ठ ३,४

३) कित्ता ७, ८

४) पवार गो.मा. महर्षी वि.रा. शिंदे जीवन व कार्य, लोकवाड्मयगृह मुंबई २००४ पृष्ठ १७२

५) भोळे भा.ल महर्षी शिंदे यांचे विचारविश्व, प्रकाशक रयत शिक्षण संस्था, सातारा ०१पृष्ठ ४१

६) शिंदे विठ्ठल रामजी, शिंदे लेख संग्रह पृष्ठ १३

७) पवार गो.मा. महर्षी वि.रा.शिंदे, नॅशनल ट्रस्ट बुक इंडिया, नवी दिल्ली ०७ पृष्ठ २९, ३०